

मराठा चेंबरच्या वतीने देण्यात येणाऱ्या 'कै. गो. स. पारखे पारितोषिकां'चे वितरण फिनोलक्स केबल्सचे अध्यक्ष प्रल्हाद छाब्रिया यांच्या हस्ते रविवारी पुण्यात करण्यात आले. पारितोषिक स्वीकारताना महेश देशमुख, शिवदास मेनन, डॉ. व्ही. एम. नाडकर्णी, मानसी करंदीकर आणि केतकी घाटे, मुखर्जी. या वेळी रवी पंडित, विश्वास देवल, अरुण पारखी उपस्थित होते.

# 'कमी वेळेत जास्त सेवा दिल्यानेच मोठ्या उद्योगांची उभारणी'

▸ प्रतिनिधी

पुणे, दि. १४ : ग्राहकांची गरज ओळखून नावीन्यपूर्ण उत्पादन, सातत्याने उत्पादनाचा उच्च दर्जा, खोलवर केलेला सकारात्मक विचार आणि कमी वेळेत जास्तीत जास्त सेवा या सगळ्यातूनच मोठे उद्योग उभे राहतात, असे स्वानुभव 'फिनोलेक्स केबल्स'चे अध्यक्ष प्रल्हाद छाब्रिया यांनी आज व्यक्त केले.

छाब्रिया यांच्या हस्ते आज टिळक स्मारक मंदिरात मराठा चेंबरच्या वतीने देण्यात येणाऱ्या गो. स. पारखे पारितोषिकाचे वितरण करण्यात आले. या वेळी आपण लघुउद्योग म्हणून सुरू केलेला फिनोलेक्स केबल्स आता कसा बहरला आहे, याचा अनुभव उद्योजकांना सांगितला.

या कार्यक्रमाला मराठा चेंबरचे अध्यक्ष रवी पंडित, एन. व्ही. जोशी, व्ही. व्ही. मुजुमदार, चेंबरचे महासंचालक एस. रामचंद्रन, अरुण पारखे, एम. जी. साठे, विश्वास देवल आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना प्रल्हाद छाब्रिया म्हणाले, की २० लाख रुपये आणि १५ कामगारांच्या जोरावर सुरू केलेला केबल व्यवसाय आज अडीच हजार कोटी रुपये आणि दोन हजार कामगारांपर्यंत पोहोचला आहे. सन १९९१ नंतर मुक्त अर्थव्यवस्थेचा अंगीकार केल्यावर लघुउद्योग सुरू करणे सोपे झाले आहे. पण, त्याचबरोबर आता उद्योजकाला जागतिक स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे. पूर्वीसारखी क्लिष्ट पद्धत राहिली नाही. चीनची खरी स्पर्धा आहे. कमीत कमी उत्पादनखर्च, मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि कमीत कमी किंमत ही चीनची उत्पादनपद्धती राहिली आहे. त्यांच्या स्पर्धेत टिकायचे असेल तर तुम्हाला सातत्याने नावीन्याचा ध्यास घ्यावा लागेल.

पारितोषिकविजेत्यांच्या वतीने महेश देशमुख यांनी सांगितले, की आपले उत्पादन करण्यासाठी पाच वर्षांचे परिश्रम आहेत. सध्या आपली १९ कोटी रुपयांची उलाढाल आहे. येत्या तीन-चार वर्षांत ही २५ दशलक्ष डॉलरपर्यंत नेणार असून जगात पहिल्या क्रमांकावर ते नेण्याचा प्रयत्न आहे.

चेंबरचे अध्यक्ष रवी पंडित यांचे अध्यक्षीय भाषण झाले. अरुण पारखे यांनी आभार मानले.

## पारितोषिकविजेते

कै. गो. स. पारखे औद्योगिक मान पारितोषिक- १) महेश देशमुख, चेतास कंट्रोल सिस्टिम. २) शिवदास मेनन, फ्लुईडाईन कंट्रोल सिस्टिम

हरी मालिनी जोशी पारितोषिक - डॉ. व्ही. एम. नाडकर्णी, रॅण्ड पॉलिप्रॉडक्टस.

रमाबाई अनंत जोशी पारितोषिक- मानसी करंदीकर आणि केतकी घाटे, ओयकोस.

डॉ. आर. जे. राठी औद्योगिक प्रदूषण नियंत्रण पारितोषिक- सह्याद्री स्टार्च अँड इंडस्ट्रीज, मिरज.

## 'त्या रात्री झोपू शकलो नाही'

मराठा चेंबरच्या पारखे औद्योगिक पारितोषिक वितरणासाठी उद्योगपती प्रल्हाद छाब्रिया यांना चेंबरने निमंत्रित केले तेव्हा त्यांना आपण लघुउद्योजक असताना मिळालेल्या पारितोषिकाची आठवण झाली. त्याविषयी प्रल्हाद छाब्रिया म्हणाले, "१९५८ मध्ये आपण कर्वे रोडला जेव्हा केबलनिर्मितीसाठी उद्योग सुरू केला तेव्हा त्या परिसरात चर्च सोडले तर दुसरे काही नव्हते. पानशेतनंतर आम्ही पिंपरीला गेलो. मराठा चेंबरचे त्या काळी पारखे पारितोषिक मिळाल्याचे पत्र आले. पारितोषिक वितरण समारंभाच्या आदल्या रात्री मी झोपू शकलो नाही."